# देवाची वाणी ह्या अंतिम दिवसांत

खरोखर ही भाग्याची गोष्ट आहे की पुन्हा एकदा ह्या सकाळी स्पेनमधील लोकांमध्ये आणि मला वाटते की जीम हे समजत आहे ओ तो ध्वनीमुद्रित करीत आहे. माझ्याकडे अजूनही लहान स्पेनमधील समूहाने केलेली ती रेकॉर्ड आहे जेव्हा मी ह्याअगोदर भाऊ गार्सिया ह्यांच्याबरोबर येथे होतो आणि जे लहान गाणी ते माझ्यासाठी गात असते ते मी विसरलो आहे. पण! ओ ते मला किती आवडत होते! आणि ती सर्व मुले आता वयात येऊन व विवाहीत झाले आहेत. मी त्यांच्याकडून तेव्हा व आताही ऐकत आहे आणि ह्या सकाळी मी आलो आहे आणि छोटया जोसेफला पाहिले आणी आता माझ्यात काहीतरी होत आहे आणि तुला पाहून मी खरोखर खूप आनंदित आहे.

2 आणि आता माझ्याकडे एक स्पेनभाषेचा शब्द आहे जो मी बोलू शकतो. तुम्हाला तो ऐकायला आवडेल का? “हालेलुयाह” तो शब्द मी कधीच विसरणार नाही. एकदा एका कानाने बधिर असलेल्या स्त्रीने माझे ऐकावे म्हणून मी प्रयत्न करीत होतो. आता मी बोलण्यात चुकू शकतो, पाहा, पण माझ्या चांगल्या स्मरणाप्रमाणे तो “ओये” तो बरोबर आहे का? माझे *ऐक*, *ऐक* “ओये” आणी परत विसरू नको “ग्लोरिया अ डीओस!” फारच अदभूत! ओह मला एकदा मेक्सीकी शहरात राजधानीत जाऊन तेथे त्यांचाशी बोलण्याची संधी मिळाली. मी किती आनंदित होतो! आणि मी करत…

3 त्यानंतर मी फिनलंड येथे होतो आणि मला कायम एका लहान फिनीश स्त्रीशी बोलण्याची आठवण येते. त्यांनी मला “बेथानी” येथे नेले. प्रत्येक राष्ट्राची आपली अशी विचारसरणी असते. (ह्या गोष्टी तुमच्या ध्यानात येत आहेत का, मी त्यांच्या अगदी जवळ आहे? तुम्हाला व्यवस्थित ऐकण्यास येत आहे का? ते कसे आहे?) ही लहान स्त्री, ती फार चांगली व्यक्ती होती. परंतु ती माझ्यासारखी होती, तिला खूप बोलायला आवडते. आणि तो भाषांतर करणारा…ती खूप जलद बोलत होती आणि — आणि भाषांतर करणारा तितक्या जलद रीतीने बोलू शकत नव्हता जे तिला बोलावेसे वाटत होते आणि ती उभी राहायची आणि तिचा चेहरा लाल होत असे, ती बोलली, “ही स्थिती बाबेलच्या लोकांप्रमाणे आहे”.

4 पण तुम्हाला माहित आहे का मला कळले की, सगळे पक्षी इंग्लीशमध्ये गातात कुत्रे इंग्लीश भाषेत भुंकतात, लहान बालके इंग्लीशमध्ये रडतात. मला आश्चर्य वाटले हे असे का असावे. परंतु आपण सगळेचजण असा विचार करीत असू की आपली——आपलीच भाषा ही हजारवर्षाच्या कालावधीतील भाषा असेल परंतु आपणांस ज्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे कारण आपल्याकडे स्वर्गीय भाषा आहे.

5 ह्या सकाळी भाऊ रोवे वॉशिंगटनचे परराष्ट्रनितीमध्ये निपुण असलेले अधिकारी आहेत. मला असा विश्वास आहे की त्यांनी पाच किंवा सहा, सात अध्यक्षांच्यी हाताखाली काम केले आहे आणि तुम्हाला माहीत आहे का की ह्या मंचावर उभे राहून बोलताना कसे वाटत आहे जेव्हा त्याच्यासारखा माणूस माझ्यामागे बसला आहे. परंतु त्याची साक्ष माझ्यासाठी फार अदभूत आहे आणि विशेषतः जेव्हा तो…मला वाटते की तो लुथरन, मी जर चुकत नसेल तर कॅथलिक किंवा लुथरन, लुथरन आणि त्याने सांगितले तो… पॅन्टेकोस्टल सभेमध्ये भटकत फिरत होता, आणि तो आपल्या जागी उठला…शेवटी तो वेदीजवळ आला आणि, जेव्हा त्याने हे केले, प्रभूने त्याला एवढे आशीर्वादित केले की…मला वाटते की तो जवळजवळ सात वेगवेगळ्या भाषेत बोलू शकतो. आणि तो

म्हणाला तो ऐक भाषा बोलण्याचा प्रयत्न करीत होता, “पण ते जमले नाही,” मग त्याने दुसरी बोलण्याचा प्रयत्न केला “ते जमुले नाही.” आणि मला वाटते तो तुमच्यासारखाच स्पॅनिश बोलू शकतो म्हणून त्याने—त्याने त्या सर्व भाषा बोलण्याचा प्रयत्न केला आणि ते त्याला जमले नाही आणि तुम्हाला माहित आहे काय झाले, परमेश्वर इतका चांगला आहे, तो खाली आला आणि त्याला अशी भाषा दिली जी बोलण्याचा त्याने कधी प्रयत्न केला नव्हता, म्हणाला “ते जमते” ते बरोबर आहे मला वाटते पलीकडच्या तीरावर हे असेच आहे.

6 त्या लहानशा चर्चच्या पुष्कळ आठवणी मी आपल्या हदयात साठविल्या आहेत, मी विश्वास ठेवतो आहे, ते कुठे आहे हे मी विसरलो आहे. ते इथे कोठेतरी टाँन्टो रस्त्याच्या जवळ आहे आणि ते मला लक्षात आहे मला “टाँन्टो स्ट्रीट”. ह्या शब्दावरून आठवते की तेथे स्पेनची अपोस्टोलीक मंडळी जमत असे.

7 मी तेथील पाळकाना म्हणत होतो, “की संजीवनासाठी ही ऐक चांगली जागा आहे,” भरपूर खोल्या नवीन प्रार्थनागृह, चांगली लोकं म्हणून मला वाटते एके दिवशी येथे संजीवनासाठी मार्ग होईल. तुम्ही त्यासाठी प्रार्थना करा, एकत्र या आणि संजीवन येऊ द्या. आता मला असे वाटते की ही पुनरावृत्ती आहे जी इतर मंडळी आपल्याला अनुभवायला मिळाली. मला आठवते तेथे खुल्या जागेत उभे राहणे, कुंपणाला टेकून राहणे रस्त्यावर रात्रीच्या वेळी इकडे – तिकडे जाणे खरोखर ती एक थरारक वेळ होती जी मी कधीच विसरू शकत नाही. आणि माझ्याकडे एक—एक ध्वनीमुद्रित रेकॉर्ड आहे. ज्यात स्त्रीयांनी आणि भावाबहिणींनी गायन केले आहे आणि ते ध्वनीमुद्रित केले आहे. ते “ओनली बिलिन्ह” हे गाणे गाण्याचा प्रयत्न करीत होते आणि ते त्यांना बरोबर जमत नव्हते, तुम्हाला माहीत आहे ते “ओनली बिलिन्ह” च्या ऐवजी ते म्हणाले, “येओनीआ बिलीव” बघा.

8 आणि मला आठवते माझी मुलगी रेबेका व सारा आणि अजूनही ते म्हणतात, “डॅडी गा, ती छोटी गाण्याची रेकॉर्ड लावा, ती छोटी...” स्पॅनिश हा शब्द बोलता येत नाही म्हणून बोलतात, “स्पिनेच मुलीच लहान स्पिनेच मुलीच गाणे ओन्ली बिलीव.”

9 मला आठवते की त्यानंतर प्रार्थनासभा झाल्या तेथे संजीवनाची लाट आली आणि पश्चिम किनाऱ्यापर्यंत बऱ्यांच सभा झाल्या आणि...एक लहानशी गोष्ट आमच्या हृदयात बोलत राहिली जेव्हा त्या दिवशी रात्री मी त्या इमारतीत गेलो, ती लहान मुले तेथे उभे राहूत गात होतो की, “तो तुमची काळजी करतो.” तुम्ही ऐकले “उन्हात किंवा सावलीत, तो तुमची काळजी करतो.” पुष्कळ वेळा परराष्ट्रात जगातील आणिबाणीच्या युद्धभूमीवर, ख्रिस्ताचा संदेश पुढे करतो, मला त्या मुली व मुले गाणे गात असताना मला आठवते की, तो तुमची काळजी घेतो उन्हात आणि सावलीत तो तुमची काळजी घेतो उजेडात आणि अंधारात हे खरेच महान उतेजना आहे फार मोठी मदत आहे.

10 तुमच्या पाळकांना भेटून व तुमचे चर्च पाहून खूप आनंद वाटला आणि तुमच्याकडे हे मोठे सुंदर आराधनालय आहे, सगळ्यांना बसण्यासाठी, पुष्कळ खोल्या खरेच पवित्र आत्माच्या हाती एक अशी जागा जेथे आपण त्याला पाहू शकतो आणि समजू शकतो की आपण संजीवनासाठी बोलावलेले आहोत. माझा विश्वास आहे की तो ते देईल.

11 आज ह्या रात्री आपण भाऊ आउटलो ह्यांचे आराधनालय ‘The जिजस’ नावाचे चर्च जे दुसऱ्या तीरावर आहे आणि भाऊ आउटलो, मी विश्वास करतो...की ती प्रेषितीय मंडळी आहे. त्याने ह्या आराधनालयाला “जिजस” हे नाव दिले आहे. मला असे वाटते की तो प्रेषितीय शिक्षणावर विश्वास ठेवणारा आहे...आणि म्हणूनच आम्ही तेथे आज रात्री जमणार

आहोत आणि आता आम्ही स्पेन मंडळीला असे म्हणत नाही की, “आता तेथे या,” कारण तुम्ही तुमच्या कार्यस्थळी राहा आणि तेथे फार मोठे ख्रिस्त्रीन बीझ मेन चे मोठे संमेलन गुरुवारी होणार आहे, दुसऱ्या मंडळीतील प्रार्थनासभा समाप्त झाल्यानंतर.त्या संमेलनात तेथे फार उत्कृष्ट प्रचारक येणार आहेत, आणि अशाप्रकारे ओरल रोबर्टस, आणि काही मेथोडिस्ट भाऊ जे आताच तारण पावलेले आहेत आणि ते असा दावा करतात की प्रचारक खूप प्रभावशाली वक्ते आहेत. आणि माझा विश्वास आहे की तुम्हाला ह्या सभांमध्ये खूप आनंद मिळेल. आणि तुम्ही किशोरवयीन मुले तेथे त्यांच्यासाठी सुध्दा सभा असणार आहे, आताच भावांनी त्याची घोषणा केली. माझी मुले ही मी घेऊन येणार आहे ह्यासाठी की ते त्यात सहभागी होऊ शकतील. आणि अशाप्रकारे येऊया, तुम्हाला सर्वांना भेटून आम्हाला आनंद होईल. परमेश्वर तुम्हा सर्वांना आशीर्वादित करो.

12 आणि आता मी पवित्र शास्त्राकडे वाळू इच्छितो आणि त्यांतील काही त्याची आशीर्वादित वचने वाचतो. आणि आजच्या सकाळी मी काही भागाची निवड केली आहे, आणखी थोडयावेळासाठी, मी तुम्हाला फारवेळ वाट पाहाण्यास लावणार नाही, आणि त्यातील एक भाग 1 शमुएल मधून व दूसरा भाग यशया मधून पाहणार आहोत. आणि प्रथम मला यशया पुस्तकातून वाचायला आवडेल. आणि मी…

13 तुम्हा सर्वांना व्यवस्थित ऐकण्यास येते आहे का? ह्या माईक मध्ये, अत्यंत हळुवार आवाज वाटत आहे. मला ठाऊक नाही का. तुम्हाला येथे नीट ऐकण्यास येते आहे का, तुमचे हात वर करा.ठीक, ठीक.

14 आता माझा घसा जरा बसलेला आहे, आणि ते खूप बोलण्यामुळे: आणि सोळा–सतरा वर्षांपूर्वीपासून मी ह्या स्पेनच्या भावाबरोबर होतो मला वाटते जवळ जवळ सोळा – सतरा वर्षांपूर्वी, तेव्हापासून मी प्रचार करीत आहे. म्हणून मी तेव्हा थकलो होतो, मी म्हणालो आणि अजूनही मला थकवा वाटत आहे. परंतु मी आजही परमेश्वराच्या कृपेने चालत आहे.

15 आता यशया 40 कडे वळूया, यशयाचा 40 वा अध्याय आणि 1ला अध्याय किंवा 9 शमूऐलचा 3रा अध्याय. अणि आपण वचन वाचीत असताना आपण आपली मस्तके प्रार्थनेसाठी काही क्षणांसाठी झुकवुया.

16 आमच्या स्वर्गीय पित्या की आम्हाला ह्या सुंदर व पवित्र आराधनालयात जे देवाला त्याच्या कार्यासाठी समर्पित केले आहे त्यांत उभे राहण्याचे भाग्य दिले. आम्ही तुझी उपकारस्तुती करतो. आणि आम्हाला माहीती आहे की तुझे सेवक ह्या मंचामागे किंवा व्यासपीठा मागे कित्येक वेळा उभे राहिले आहेत आणि आपले जीवन तुझ्या सेवेसाठी समर्पित केले आहे.

17 आणि *येथे*; ह्या सकाळी, मला आठवणी देतात, संजीवनाच्या आठवणी ज्याची आताच सुरुवात झाली होती, पवित्र आत्मा मोठया प्रकाशाच्या स्वरुपात, अग्नीस्तंभासारखा खाली उतरला होता, आणि तो बोलला की हा संदेश सर्व पृथ्वीवर पसरला पाहिजे. आणि आता आज हा इतिहासजमा आहे. हे पाहिल्यावर हा संदेश अग्निसारखा पेट घेतला महान मनुष्यांद्वारे जसे ओरल रोबर्टस आणि टॅंमी ऑस्बन आणि टॅंमी हिस्क आणि कित्येक असे. आणि आम्हा सर्वांच्या प्रयत्नांद्वारे, आपण पाहतो की ह्या संदेशाने आकाशाखालील प्रत्येक राष्ट्रांमध्ये संजीवनाचा अग्नी पेटविला, पन्नासाव्या दिवसाचा संदेश ह्यासाठी आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझी स्तुती करतो, हो सामर्थी परमेश्वरा.

18 आणि आज ह्यासमयी आम्ही प्रार्थना करितो की तु आमची अंत:करणाची सुधारणा व तयारी कर त्या महान रूपांतरासाठी जे लवकर होणार आहे असा आमचा विश्वास आहे. आणि जर आमची अंतकरणे त्यासाठी तयार नसतील किंवा इतर गोष्टी ज्या आमच्यासाठी तू साठविल्या आहेत, आम्ही प्रार्थना करितो की आमच्या कमतरतेबद्दल आम्हाला क्षमा कर, आणि आजच्या तुझ्या वचनाद्वारे आमच्याशी बोल.ह्या मंडळीच्या पाळकांना वडिलांना, विश्वासू कारभाऱ्यांना आणि सर्व सेवक, सभासदांना आशीर्वादित कर. तसेच हा छोटासा गाणे गाणारा समुह आणि पियानो वादक, इतर वाद्य वाजविणारे सर्वांना आशीर्वादित कर, तसेच ह्या भवनात प्रवेश करणाऱ्या सर्वांना आशीर्वादित कर. ते येताना होते त्यापेक्षा येथून जाताना बदलून आधिक तुझ्या जवळ येवोत. हे प्रदान कर पित्या आणि ह्या आजच्या सकाळी त्याप्रमाणे होवो, येशूच्या नावाने मागतो म्हणून मान्य कर आमेन.

19 आता यशया पुस्तकाच्या, 40 अध्यायाकडे वळूया, आपण वाचूया

*सांत्वन करा, माझ्या लोकांचे सांत्वन करा, असे तुमचा देव म्हणतो.*

*येरुशलेमेच्या मनाला धीर येईल असे देव बोलला, तिला पुकारून सांगा, तुझे युद्ध संपले आहे. तुझ्या पापाबद्दलचा दंड मिळाला आहे, परमेश्वराच्या हातून तुझ्या सर्व पापांचा तुला दुप्पट बदला मिळाला आहे.*

*घोषणा करणाऱ्याची वाणी ऐकू येते की, अरण्यात परमेश्वराचा मार्ग सिद्ध करा, आमच्या देवासाठी रानात सरळ राजमार्ग करा.*

*प्रत्येक खोरे उंच होवो, प्रत्येक डोंगर व टेकडी सखल होवो; उंचसखल असेल ते सपाट होवो व खडकाळीचे मैदान होवो;*

*म्हणजे परमेश्वराचे गौरव प्रगट होइल अणि सर्व मानवजाति एकत्र मिळून ते पाहिल, कारण हे बोलणे परमेश्वराच्या तोंडचे आहे.*

आता शमुवेलाच्या पुस्तकात, 1 शमुएल, 3रा अध्याय, मी 1ले, 2रे आणि 19 वे वचन वाचू इच्छितो.

*आणि शमुएल बाळ एलीसमक्ष परमेश्वराची सेवा करीत असे. त्या काळी परमेश्वराचे वचन दुर्लभ झाले होते. त्याचे दृष्टांत प्राय: होत नसत.*

*त्या समयी एकदा असे झाले की एली आपल्या ठिकाणी निजला होता, (त्याची दृष्टी मंद होऊ लागली होती म्हणून त्यास दिसत नव्हते)*

*देवाचा दीप अजून माळवला नव्हता, आणि शमुवेल परमेश्वराच्या मंदिरात जेथे देवाचा कोश होता तेथे निजला होता.*

*तेव्हा परमेश्वराने शमुएलास हाक मारली...अणि शमुएल म्हणाला, बोल तुझा दास ऐकत आहे.*

19 वे वचन

*आणि शमुएल वाढत गेला. परमेश्वर त्याच्या समागमे असे व त्याचे कोणतेही वचन त्याने वाया जाऊ दिले नाही.*

20 ओह, हा भाग इतका पुरेल ही महिनाभर त्यावर आपण बोलू शकतो आणि ह्या अदभूत वचनांतून आपण खूप काही घेऊ शकतो. परंतु ह्या सकाळी आणि आपल्याकडे फक्त २० मिनिटाचा अवधी ह्यातून जाण्यासाठी आहे, मला वाटते की संडे स्कूल झाले

असेल किंवा ह्यानंतर होणार असेल, मला ठाऊक नाही तरी परंतु, हा वाचलेला लेख मला *देवाची वाणी ह्या अंतिम दिवसांत* ह्याविषयी बोलण्यासाठी हवा आहे.

21 हा खूप अद्भूत समय आहे. आपल्याला समजते की ज्या वचनांतून आपण आज बोलत आहोत तेथे म्हटले आहे, "शमुएलाच्या काळात दृष्टांत प्राय: होत नसत." म्हणून. जेथे दृष्टांत नाही, "तेथे पवित्र शास्त्र म्हणते" लोक नाश पावतात. "आपल्याला दृष्टांत झाले पाहिजे. आणि दृष्टांत संदेष्टाकडे येतात, आणि तो देवाचा शब्द असतो जो त्यांच्याजवळ बोलला जातो.

22 आणि आपल्याला समजते की एली हा संदेष्टा नव्हता, एली याजक होता. आणि तो वृद्ध होत चालला होता, आणि त्याची दृष्टी मंद होऊ लागली होती, आणि त्याला आजूबाजूचे दिसते नव्हते, की तेथे वजनदार मनुष्य होता. आणि देवाच्या कामाकडे त्याचे दुर्लक्ष होते.

23 आणि आजही अशाचप्रकारे होत आहे. मला वाटते मंडळी, संघटना आणि संप्रदाय, ते कार्यक्षेत्रात फार काळापासून आहेत आणि ते चालढकल करण्याची सुरुवात करीत आहेत. आणि देवाचे काम अर्धवट सोडीत आहेत. सत्याचे वचन कारण मंडळीच स्वत: मंद दृष्टीची होत चालली आहे. आणि आज आपल्याला देवाची वाणी आमच्याशी बोलावी आपल्याला परत आणावे अशी गरज आहे.

24 आणि, पाहा, एली खाली निजला होता, आणि...त्याची दृष्टी मंद झाली होती. तो याजक होता. आणि त्यांना देवाकडून दृष्टांत होत नव्हता. आणि त्याची नितांत आवश्यक्ता होती.

25 आणि देवाने गरजेच्या समयात ती भागविण्याचे अभिवचन दिले आहे. तो नेहमीचे ते करतो. आणि आज देवाच्या वाणीची आपल्याला गरज आहे ह्या काळाची गरज आहे ह्या समयाची गरज ज्यात आपण राहत आहोत. आणि त्याने अभिवचन दिले आहे म्हणून आपण निश्चिन्त राहू शकतो की तो त्याचे वचन पाळतो. तोच विश्वास एक विश्वासी ते देणाऱ्यावर ठेवतो, की त्याने गरज भागविण्याचे अभिवचन दिले आहे.

26 आणि आज मंडळी ह्या स्थितीत असण्याच हे एक कारण आहे की येथे पुष्कळ वाण्या आहेत, पुष्कळ अशा वाण्या देवाच्या वचनापासून मंडळीला आकर्षित करतात, तरीही ही संशयजनक बाब आहे की बुहतेक जण ही देवाची वाणी ऐकतील जरी ती त्यांच्यामध्ये सत्य तेच बोलली तरी ती समजणार देखील नाही, कारण ती त्यांच्यासाठी अपरिचीत परकीय अशी गोष्ट आहे. त्यांनी स्वत:ला आजच्या युगातील आवाजांकडे एवढे केंद्रित करून घेतले आहे

27 आणि जर आपण वाचलेल्या वाचनाकडे लक्ष लावले तर समजेल की देवाची वाणी त्यांच्यासाठी परकीय होती.

28 आणि आजही अशाच प्रकारे पुन्हा होत आहे. की देवाची वाणी...तेथे अनेक अशा दुसऱ्या वाण्या आहेत. आणि जर देवाने आपल्याला वचन दिले आहे की तो ती आपल्याला देईल, आणि जर इतर वाण्या देवाच्या वाणीच्या विरुद्ध आहेत, तर मग ती निश्चीतच आपल्या शत्रूची वाणी आहे, आपल्याला गोंधळविण्यासाठी ह्यासाठी की देवाची वाणी शमुवेलसह जेव्हा बोलेल तेव्हा ती आपल्याला कळू नये.

29 आणि जर आपण पाहिले तर एलीबरोबर ही अशाचप्रकारे काहीतरी झाले, परंतु एलीने बरोबर ओळखले की ती देवाची आहे. आणि त्या वाणीत एलीवर एक—एक निंदात्मक आरोप होता. कारण देवाची वाणी शमुवेलाशी बोलत होती, त्याला एलीच्या

चुकीच्या कृत्याविषयी सांगत होती, त्याने त्याच्या पुत्रांस लाडाविले होते आणि ते पैसे घेत होते आणि – आणि होमबली अर्पिण्यास आणलेले मांस ते घेत असत. ते बरोबर नव्हते. आणि ते चुकीच्या गोष्टी करीत होते, देवाच्या वचनाविरुद्ध.

30 आणि शमुवेलाकडे…फक्त एक गोष्ट होती जी शमुवेल करू शकत होता की तो जसेच्या तसे बोलू शकेल. आणि हे करण्यास त्याला भय वाटले, कारण ते एली व मंदिरा विरुद्ध होते जेथे त्याला वाढविण्याकरिता पाठविले होते. पण एली बोलला, “तू बोल” पाहा? आणि त्याने त्याला जे काही पुढे होणार आहे ते जसेच्या तसे सांगितले, तो शमुवेल…एलीची “याजकाची सेवा संपली होती.” कारण देव बोलला होता, आणि परमेश्वर आपला संदेश शमुवेल त्याच्या संदेष्टा ह्याच्याद्वारे पाठवित होता. एक वेगळा जन्म लहानपणापासून देवाला समर्पित केलेला असा. परमेश्वर त्याच्याशी लहानांशी बोलावे तसा बोलला, आणि त्याला कामासाठी जे त्याला पुढे भविष्यात करावयाचे होते, त्यासाठी तयार करीत होता. आणि एलीची वेळ संपत आली होती.

31 आज पृथ्वीवर कितीतरी आवाज आहेत ती अतिशय कठीण गोष्ट आहे. कारण ते अदभूत दैवी वाणीची तीव्रता अत्यंत कमी करत आहे. तेथे कितीतरी ज्ञानाने भरलेल्या वाण्या आहेत, सामर्थ्यशाली मनुष्यांच्या महान वाण्या जे ज्ञानी आहेत ते त्यांच्या ज्ञानाच्या स्थितीने राष्ट्रे हादरवितात. ते एका रात्रीत बनलेले लोक नाहीत, पण ते राष्ट्रांना हादरवितात, महान संघटनांना एकत्र आणतात. मोठ्या सभा सुशोभित करतात. आणि कोणीही व्यक्ती जरा गोंधळूनच जाईल त्यांना गोंधळविण्यास ते पुरेसे आहे, कशाप्रकारे ह्या गोष्टी चालतात आणि भरभराटीस येतात. आणि तेथे अशा वाण्या आहेत त्या – त्या उंचावल्या आणि अशा गोष्टी होतात, आणि त्या देवाची वाणी जी देवाची सत्यवाणी कुठेतरी मागच्या बाजूला सारतात.

32 “आणि देवाची वाणी,” ते म्हणतात, “आम्हाला कसे कळेल कि ही देवाची वाणी आहे?” कारण आजच्यासाठी…तेव्हा ती ठरविलेल्या संदेष्टात होती. आता आज आम्ही कसे ओळखणार की ही देवाची वाणी आहे, कारण ती संदेष्टाच्या वचनाचे प्रकटीकरण आहे. *हा* देवाचा संदेष्टा आहे. आणि देवाची सत्यवाणीच फक्त आपल्याला खऱ्या, जीवंत, अदभूत देवाच्या अदभूत वचनासह, सत्यवचनाच्या अदभूत प्रकटीकरणाकडे आणते. मग आपल्याला कळते की ही देवाचीच वाणी आहे. कारण, आणि ते अदभूत…ह्या इतर वातावरणात इतक्या दुसऱ्या आहेत, की त्या पुर्णपणे तिला मारून टाकतात. परंतु, लक्षात ठेवा, ते जरूर चकाकणारच.ते पुढे येईल! ते काम करील.

33 आता, आज राजकारणाच्या जगात ही एक वाणी आहे. ती मोठी वाणी आहे. आणि लोकं खरोखर, ह्या राजकारणाच्या महान दिवसात ते करतील…ते त्यांच्या मंडळीत सर्व भेसळ करतील आणि सर्व गोष्टीत आणि खूप वेळा, नुकताच आपण पाहिले, की मंडळ्यांना राजकारणाची वाणी ही देवाच्या वाणीपेक्षा वरचढ आहे, किंवा अमेरिकन लोकांनी जे आता केले ते त्यांनी कधीच केल नसतं. पाहा? ते त्यांनी कधीच केल नसतं. जर देवाची वाणी मंडळीमध्ये जीवंत ठेवली असती, तर त्यांनी कधीच चुका केल्या नसत्या परंतु राजकारणाची वाणी आज पृथ्वीवर देवाच्या वाणीपेक्षा इतकी वरचढ आहे की लोक त्यांचा ख्रिस्तीत्वाचा जेष्ठत्वाचा हक्क गोंधळाद्वारे प्रसिद्धी, शिक्षण आणि राजकारणाची शक्ती ह्या गोष्टींसाठी विकत आहेत. हे पाहुन अत्यंत लज्जास्पद वाटते. एक अशी गोष्ट ज्यावर आपले राष्ट्र बनले, कशावर ते बनले? लोक दूसरीकडे वळले आणि – आणि त्यांनी अशा गोष्टीची निवड केली की आम्ही दूसरे राष्ट्र सोडले. आणि ते—आणि ते प्लायमाऊथ रॉक आणि *मेफ्लॉवर* आणि—आणि ते येथे आले आणि आज ही जी अर्थव्यवस्था आहे हीची स्थापना

केली. ज्या गोष्टींतून बाहेर येण्यासाठी आपण आज लढलो, तिच्याच कचाटयात आपण पुन्हा सापडलो, कारण पवित्र शास्त्र सांगते की हे अशाप्रकारे होईलच.

34 आणि एलीची कार्यप्रणाली अशी होती – एका संदेष्ट्याऐवजी एक याजक संदेष्टा हा वचन आहे. आणि याजक हा मंडळीला दर्शवितो.

35 आणि ते त्याठिकाणी असे होते की त्यांना वचानाविषयी महत्व न वाटता ते त्या लोकांसाठी परकीय झाले. त्यांना ते समजत नाही तेव्हा ते तुम्ही बोलता, आणि ते त्यांना समजत नाही, कारण त्यांना त्याचा सराव नव्हता. पौल म्हणतो, "जर कर्णा अस्पष्ट नाद काढील, तर लढाईस जाण्याची तयारी कोण करील"?

36 लोकांना मंडळींतील एक—एक—एका वाणीचा, मंडळींतील तुतारीचा सराव असतो. "आमचे संडे स्कूल इतरांपेक्षा जास्त आहेत. त्या गोष्टीला काही अर्थ नाही. आमच्या संप्रदायात इतरांच्यापेक्षा खूप गोष्टी आहेत. आमचा संप्रदाय सर्वांत मोठा आहे." पाहा अशाप्रकारच्या वाणीचा लोकांना सराव असतो. ते रस्त्यावर लोकांना शोधण्यासाठी जातात आणि त्यांना घेऊन येतात. मोठया मोहिमेद्वारे हजारो हजार लोकांना आत आणतात. त्यांचा रस कशात असतो? "आमचे आराधनालयच सर्वात मोठे आहे. आमची मंडळी सर्वात मोठी आहे. आमचे संडे स्कूलमध्ये सर्वांत जास्त सभासद आहेत. आमच्या मंडळीत ह्या शहराचे मेयर येतात." ते सर्व चांगले आहे परंतु जर ह्या मंडळीस परमेश्वराची वाणी सुवार्तेची तुतारी ऐकण्याचा किंवा समजण्याचा सराव नसेल, त्यातून काय चांगले निष्पण होणार?

37 आणि जेव्हा गोष्टी उंचबळून येतात जश्या आमच्या सरकारी दरबारात उचंबळून येतात, तर काय होत? मंडळीला तुतारीचा नाद समजत नाही, आणि त्यांना काय करावे ते कळत नाही. महान भरभराटीचे वचन, ज्ञानाचा राक्षस आत येतो, पवित्र शास्त्रात सांगितलेल्या मुळ गोष्टीवर आघात करतात, आणि इतर गोष्टी आत येतात. पाहा, राजकारणातील वाणी, आणि असे दिसते ती धार्मिक वाणीच्याही पुढे गेली आहे. किंवा त्यांनी जे केले ते कधीच केले नसते, सुवार्तेची वाणी कारण आपल्याला खूप अभिवचने दिली आहेत. आपल्याला भरभराटीचे अभिवचन दिले आहे, आणि नि:संशय परंतु आपल्याला काय मिळणार?

38 परंतु विश्वासणाऱ्यासाठी ह्या गोष्टी काही नाहीत. इब्रीकरांच्या पुस्तकात वळूया, 11 वा अध्याय. संत पौल तेथे काय सांगत आहे ते ऐकूया "ते मेंढरांची व शेरडांची कातडी पांघरून फिरत असत, ते लाचार, पीडित, त्रासलेले असे होते. त्यांना जग योग्य नव्हते. ते अरण्यांतून, डोंगरांतून, गुहांतून व जमिनीतल्या विवरांतून भटकत राहत असत."

39 मी नायसिआ सभेविषयी वाचत होतो, जेव्हा येशू ख्रिस्तांच्या मरणानंतर ३०० वर्षांनंतर, मोठया समस्या नायसिया सभेपुढे आल्या तेव्हा ते मोठे चर्च पवित्रशास्त्रामध्ये जे काही आहे त्या बाजूने उभे राहिले. आणि रोमी धर्म स्विकारलेली रोममधील पहिली मंडळी इतर विशिष्ट शिकवणी आत घातल्या. उदाहणार्थ आपल्याकडे नाताळ साजरा केला जातो.

40 ख्रिसमस, ख्रिस्ताचा जन्म २५ डिसेंबरला मूळीच झाला नाही. कारण, यहूदातील टेकड्या त्यावेळी बर्फाळ होत्या, आणि तो…हे पवित्रशास्त्राच्या भविष्यवाणीच्या विरुद्ध आहेत. त्याचा जन्म वसंत ऋतुत झाला, ज्यावेळी मेंढरे जन्माला येतात. त्याचा जन्म एका घराऐवजी गोठयात का झाला? तो एक कोकरा होता. तो वेदीकडे का गेला नाही. तर त्याला क्रूसाकडे, त्याला वधस्तंभाकडे नेले गेले. वेदींकडे का नेले जेथे त्याला क्रूसावर

खिळले गेले. तुम्ही मेंढ्यांना कापणाऱ्याकडे नेतात. तो मेंढरू होता. जेव्हा मेंढरांचा जन्म होतो तेव्हा तो जन्माला आला.

41 पण, पाहा, हे करण्यासाठी त्यांनी सुर्यदेवाच्या वाढदिवसाची सुरुवात केली, जो सूर्य मालिकेत, सूर्य डिसेंबर महिन्यात पाच दिवस २० डिसेंबर पासून २५ डिसेंबर पर्यत त्याच्या किंचीत हालचाल होते. प्रत्येक दिवशी त्या—त्यांच्यात किंचीत बदल होतो. तो मोठा आणि मोठा होत जातो. सर्वांत मोठा दिवस जुलै महिन्यात येईपर्यंत डिसेंबर महिन्यात सर्वांत लहान दिवस असतो. आणि २५ तारखेपर्यंत म्हणजे २० पासून २५ तारखेपर्यंत तेथे रोमी जत्रा भरते आणि तेथे सुर्यदेवाचा वाढदिवस साजरा केला जातो. नंतर ज्यूपिटर जो रोमी दैवत आणि अशाच गोष्टी त्यांनी घातल्या आहेत, ते म्हणतात, “आम्ही देवाच्या पुत्राचा आणि सुर्य देवाचा वाढदिवस एकेच दिवशी एकत्र मोठया तऱ्हेने साजरा करू.” ते पवित्रशास्त्राच्या विरुद्ध आहे. आणि अशा अनेक गोष्टी त्यांनी त्यात घातल्या आहेत.

42 आणि जेव्हा देवाचे खरे लोक जे वचनाबरोबर राहू इच्छितात, जसे पोलीकार्प, इरेनियस, मार्टीन असे अनेक, संत जन जे सत्याबरोबर राहू इच्छित होते...आणि जेव्हा ते नायसिया सभेत आले, त्यातील कित्येक जणांना नाकारण्यात आले. इतपर्यंत की जंगलांतून संदेष्टे आले ज्यांच्याकडे कोकऱ्यांच्या कातड्याचा तुकडयाशिवाय दुसरे वस्त्र ही नव्हते, जे त्या सभेत बसण्यात आले. परंतु त्यांना देवाचे वचन माहित होते.

43 परंतु लोकप्रियतेसाठी त्या १५ दिवसामध्ये अत्यंत घाणेरडे राजकारण खेळले गेले व त्यांच्यावर पायमल्ली केली गेली. नंतर हजारो वर्षांचे अंधकारमय युग दृष्टीपथास आले. परंतु देवाने अभिवचन दिले आहे तो पुन्हा ती तुतारी वाजविल. त्याचे लोक नेहमीच त्याच्या वचनाची सत्य वाणी ऐकतात, नेहमीच ते जे काही करतात त्याचे वचनातून परीक्षण करतात.

44 राजकारणाची वाणी. आणि अमेरिका आणि जगातील इतर ठिकाणी आपल्याला मोठमोठ्या वाण्या बोलताना आज दिसतात आणि ती हॉलीवूडची वाणी आहे. तीने संपूर्ण जगाला काबीज केले आहे. जर हॉलीवूडने एखादी गोष्ट आणली तर ती संपूर्ण देशभर आपल्याला पाहायला मिळते. आता आपल्याला दिसते की ते आपल्या स्त्रियांसाठी एक नमुना झाल्या आहेत त्यांच्या पेहराव, त्यांची केशभूषा. त्यांनी तशाप्रकारचा पेहरावाचा आदर्श ठरविला आहे.

45 परंतु मंडळीने त्याविषयी देवाच्या तुतारीचा नाद ओळखलाच पाहिजे परंतु तेथे इतका गोंधळ आहे कारण ते इतरांचे उदाहरण आपल्या समोर ठेवतात. तुम्ही स्वतःची उभारणी अशा प्रकारची उदाहरण पुढे ठेऊन करू नका कारण ते सर्व नाशवंत आहे. सदैव देवाची वाणी ऐका, की ती ह्याविषयी काय सांगत आहे.

46 आणि आपण पाहतो, हॉलीवूड, ते अशा गोष्टी करतात. आणि पुढे जाण्या अगोदर मला आणखी थोडावेळ ह्याविषयावर बोलू दया. खूप काळ झाला नाही, तेथे एक—एक गोष्ट उदयास आली, हॉलीवूड मधील एक—एक पुरुष...त्या पुरुषाविरुध्द काही नाही, तो मरणाधीन आहे ज्याच्यासाठी ख्रिस्त मरण पावला आहे, परंतु तुम्हाला दाखविण्यासाठी. त्यांनी एका लहान गोष्टीचा शोध लावला. मुले त्याला “हुला – हूप” हुला – हूप, अशीच काहीतरी हाक मारीत असत. आणि जर तुम्ही पहिले तर अश्लिलता आणि अशा गोष्टी लहान मुलांमध्ये खूप वाढल्या व त्याच्या ते आहारी गेले, हे बरोबर नाही.

47 आता, हॉलीवूड हे पूर्ण—पूर्णतः बंदूक योध्द्यांनी भरले आहे. ज्यांना इतिहास ठाऊक आहे, ते जाणतात हे लोक त्या दिवसांत, हे बंदूक योद्धे म्हणजे वेगळ्या प्रकारचे

लोक, ते सभ्य समजले जात नसत, ते विश्वासघातकी होते. ते अल कॅपवन आणि डिलींजर सारखे होते. टेलीविजन वर एक हॉलीवूड नाटक होत असे, त्याचे नाव, "गनस्मोक". आणि मी *टीव्हीवर* दुसऱ्या दिवशी असे ऐकले होते की त्यात काम करणारा व्यक्ती, आणि जो मॅट डिल्लोन, जो कन्सास येथील शेरीफ होता त्याची भुमिका दर्शवित होता. आणि मॅट डिल्लोन हा सशासारखा पिवळ्या रंगाचा होता. त्यांने २८ मनुष्यांना गोळीने मारले, जे निर्दोष लोक. डॉज शहराच्या बाहेर जाणारे होते आणि झुडपात वाट पाहात होते आणि जेव्हा एखादा माणूस तेथून जात असे, कोणीतरी त्याला हाक मारून सांगत असे तेथे एक खलनायक येतो तुम्ही तेथेच राहा आणि, जेव्हा तो मनुष्य आत येई, तो पाठून त्याला गोळी मारीत असे. आपल्याला दिसते की तो "मोठा मनुष्या" जो खाली येत असे. का, हे—हे तर खरे पाहतो पापाचा गौरव करणे होय. परंतु आपल्या देशातील लहान मुले मॅट डीलोंच्या विषयी येशू ख्रिस्ता पेक्षा अधिक सांगू शकतात. त्या—त्या—त्या दुकानात टेन—सेंट दुकानात आणि कपड्याच्या दुकानात छोटया—छोटया खेळण्यातील बंदुकी लटकविलेल्या असतात, आणि लहान टोप्या की—की तुम्ही कुठूनही त्या विकत घेऊ शकतात. हे ठीक आहे की तुम्ही त्या घालता, परंतु मी—मी तुम्हाला सांगू इच्छितो की तुम्ही ह्या गोष्टी पाहा. नंतर ते—ते, हे व्यापारी जग अशाप्रकारच्या गोष्टी बाजारात घेऊन येतात आणि त्यांवर लाखो डॉलर्स मिळवतात

48 आपल्या कडे "सेंट पॅट्रीक" स दिवस आपण त्याला "धार्मिक सुद्या" म्हणतो हे साजरे केले जातात आणि व्यापारी जगताने ह्या गोष्टी वर उचलल्या आहेत, आणि ते त्यापासून लाखो डॉलर्स मिळवीत आहेत. "(मदर्स डे) मातृदिवस फूलांचे गुच्छ का?, आईसाठी प्रत्येक दिवस हा सन्मानीय दिवस आहे. आई कुठेतरी असेल, वृद्धावस्थेत जा आणि तिची भेट घ्या. ही गोष्ट तिच्यासाठी फार मोलाची असेल केवळ फूले किंवा काही भेटी तिला पाठविण्याऐवजी. पण, पाहा ते ह्या गोष्टी घेतात. हा एक आवाज आहे व—व त्याने आम्ही मिसळलो गेलो आहोत. हे योग्य नाहीए तुम्ही याद्वारे काय करणार आहात? पाहा, आपण—आपण केवळ...

49 येथे मी तुम्हाला एक मुद्दा सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, जे मला—मला वाटते. देवाची वाणी ही दुर्मिळ वाणी आहे.

50 आता आपल्याला कळते की त्यांनी एक प्रगतीची गती ठेवली आहे आणि तुम्ही हे पहिले का? आपली तरुण मुले "रिकी" आणि "एल्वीस" तुम्ही आपल्या मुलांची नावे अशी ठेवतात आताच त्यांत बदल करा, त्यांना अंकाने बोलवा, "एक" किंवा "दोन" किंवा आणि काहीतर. परंतु तसे करू नका, हे अतिशय भयानक आहे...तुम्ही म्हणाला, "तसे नावे ठेवल्याने काय फरक पडणार आहे?". का, नक्कीच काहीतरी फरक पडणार. कारण तुमच्या नावावरून तुमचे चारित्र्य समजते. "भाऊ ब्रॅन्हम तुम्ही आता अंकशास्त्रा विषयी बोलत आहात." नाही मी नाही मी प्रभू परमेश्वर बोलत आहे! ह्याविषयी बोलत आहे. याकोबाच्या बाबत असे का होते तो त्याच्या नावाप्रमाणे वागत होता. एक—एक फसव्या, लबाड, याकोब. आणि जेव्हा देवाने त्याला बदलले, त्याने त्याचे नाव बदलले. देवाने शौलाचे नाव पौल आणि शिमोनाचे पेत्र असे केले निश्चित, ह्यात काहीतरी आहे. आणि रिकी आणि एल्विस, आणि अशी नावे, हि आधुनिक अमेरिकेची नावे आहेत जे सहजरीतीने लेकरांना त्यात पाडीत आहेत. मला काय सांगायचे आहे ते समजून घ्या?

51 आता, मी...मी विषयापासून दूर न जाता मी विषयाकडे येतो. (पाहा मला काय सांगायचे आहे?) ते तुम्हाला समजणार नाही. परंतु ह्या गोष्टी सामान्य माणसाला समजत नाहीत. ते त्या गोष्टीकडे लक्ष देत नाहीत, कारण त्यांना एक दिशाच ठाऊक आहे. ते फक्त त्याच वाण्यांकडे लक्ष देतात.

52 तेथे तत्वज्ञान्याच्या वाण्यां, समाजवादाच्या अनेक आश्वासन देतात जे ते पूर्ण करू शकत नाही. आणि तरीही अमेरिकेतील बहुतेक टक्के लोक समाजवादात अडकले आहे. मी जर्मनीत, बर्लिनच्या पूर्वेस समाजवादी पट्ट्यात गेलो होतो. त्यांच्याकडे दिखावा करण्यासाठी मोठमोठी घरे (इमारती) आहेत तुम्ही गेल्यावर तुम्हाला कळते, की त्यांचे काम पूर्ण नाही. तेथे खोटे अर्थशास्त्र आहे, ते काहीतरी दुसरे दाखविण्याचा प्रयत्न करतात.

53 आणि रशिया जी साम्यवादाची जन्मभूमी...जी खूप वर्षाअगोदर, जेव्हा मी अगदी नवखा प्रचारक होतो, मी सांगतो की 33 वर्षाअगोदर जेव्हा नाझीवाद, फासीवाद आणि साम्यवाद्य उदयास येत होते, मी म्हणालो, "मी प्रभूच्या नावाने बोलतो ते सगळे साम्यवादात एकत्र होतील." परंतु तुम्ही कधी विचार केला का, देवाने त्यापासून आपल्याला राखून ठेवले, जर आपण ते घेतले रशियाचे केवळ एक टक्के लोक साम्यवादी आहे, एक टक्का, परंतु तेच सर्व नियंत्रित करणारे आहेत. एक टक्का साम्यवादी आहे. पण तोच नियंत्रण करणारा आहे.

54 आणि त्याच प्रकारे हॉलीवूड एकच जागा आहे परंतु तिचा सर्वांवर पगडा आहे.

55 जवळ जवळ अमेरिकेतिल १/३ किंवा २/३ जनता चर्च ला जाते आणि ते चर्चचे सभासद आहेत, पण त्यांचे सर्व संप्रदायावर अधिकार आहे.

56 आज साम्यवादाला कसली गरज असेल तर ती देवाची वाणी त्यांच्यामध्ये येण्याची, ती त्यांना लज्जित व फजित करील.

57 फिनलँडमध्ये त्या दिवशी जेव्हा एक लहान मुलगा मेलेल्यांतून उठविला गेला, त्यांनी मला 3 मीटर दूर, त्या छोट्या मुलाकडे आणले जो मेलेल्यांतून उठविला, त्यावेळी साम्यवादी सैनिक, रशियन तेथे रशियन सलामी देण्यासाठी अश्रूपूर्ण नेत्रांनी तेथे उभे होते. ते म्हणाले, "आम्ही त्या देवाचा स्विकार करून जो मेलेल्यांना जीवंत करू शकतो." हा कॅथलिक मंडळी आणि लुथरन मंडळी आणि इतर सगळे संप्रदायांचा निष्काळजीपणा आहे, आणि ते सर्व पैसा गोळा करतात आणि संघटना बांधतात आणि लोकांना काहीच देत नाही ते इतर लोकाप्रमाणेच जगतात. तेथे...

58 देवाचे वचन घेऊन येणाऱ्या संदेष्ट्याची आज रशियाला गरज आहे. ते तोंड बंद करू शक—शकते. तरच ते 90 टक्के लोक ते घेतील.

59 अमेरिकेला कशाची गरज असेल तर देवाच्या संदेष्ट्याच्या वचनाची आहे, जो उभा राहू शकतो आणि हॉलीवूड चा निषेध करू शकतो आणि अशाच गोष्टींचा येशू ख्रिस्ताच्या नावात निषेध करू शकतो, आणि पवित्र आत्म्याद्वारे चालविलेली मंडळी तयार होईल. खूप प्रकारचे गोंधळ माजले आहे पाहा, अनेक वाण्या वचनाच्या विरुध्द आहेत.

60 एक मंडळी त्याची वाणी प्रत्येक जणाला खूप सभासद पाहिजे. बाप्तीस्ट चर्च ला सगळे पाहिजेत, मेथडिस्ट ना सगळे पाहिजेत, प्रेसबिटेरियन. आपल्याला सगळीकडे हेच दिसते. कॅथलिक असे पाहतात जणूकाही ते सगळ्यांनाच आपल्याकडे घेणार, आणि ते घेतील. पवित्रशास्त्रानूसार देवाची वाणी आहे. ते सर्वांवर सत्ता करील.

61 परंतु अंती सर्वसमर्थ परमेश्वरच राज्य करील. एके दिवशी संतजन सर्व हाती घेतील, पवित्रशास्त्र हे सांगते. ते ताबा घेतील.

62 अशा अनेक भयंकर वाण्या! नंतर तेथे खोटया संदेष्टयाची वाणी आहे. ती भयंकर वाणी, एक मनुष्य जो स्वतःला संदेष्टा म्हणतो. एक संदेष्टा अर्थात तो प्रचारक असतो. आधुनिक शब्द "संदेष्टा" म्हणजे "एक मनुष्य जो प्रभावाखाली येऊन प्रचार करतो."

तेथे एक मनुष्य उभा राहतो आणि स्वतःला संदेष्टा म्हणतो, आणि देवाचे वचन नाकारतो देवाचे सत्य नाकारतो. तेथे खूप प्रकारच्या वाण्या आहेत!

63 काही क्षणापूर्वी, तेथे एक भाऊ होता जो तेथे वर कसे यावे ह्याविषयी मला निर्देश देत होता. पण मला...वाटते त्याला आश्चर्य वाटले की मी का रस्त्यावर गेलो आणि माघारी फिरलो आणि परत आलो. भाऊ जर तुम्ही इथे आहात, मी काहीतरी वेगळे ऐकत होतो, तो आमचा—आमचा काळया वर्णाचा मित्र, निग्रो. त्यांचे येथे मंदिर आहे, आणि ते त्यास, द इलायजा मोहमद "म्हणून संबोधतात," किवा असेच काही, "तरुण इलायजा मोहमद." एक वाणी उभारत, आणि म्हणतात कि ते ती वाणी आहेत जी ह्या—ह्या काळ्या वर्णीय लोकांच्या जातीला ह्या गोंधळातून बाहेर आणतील. तुम्ही पहिले, ही गोष्ट – त्यांचे—त्यांचे—त्यांचे, ते मुस्लिम येथे आहेत, त्यांची मशीद. त्यांची पार्श्वभूमी चुकीची आहे, हे तुम्ही का पाहत नाही!

64 काळ्या वर्णांचे लोक तसेच श्वेत वर्णांसारखे भुऱ्या वर्णांसारखे आणि पिवळयावर्ण लोकांनो मोहमदकडे नको तर खिस्ताकडे या खऱ्या सिद्धान्तांकडे जे पवित्रशास्त्र शिकविते. मोहमदांची शिकवण ही वचनाच्या विरुद्ध आहे. दर्बन दक्षिण अफ्रिकेत एक दिवशी मला मुस्लिम लोकांना ख्रिस्ताकडे वळविण्याची संधी मिळाली ह्यातून दूसरे काहीच नाही पण मानसिकता निर्माण होते. आणि मानसशास्त्र ही तो पर्यंत बरोबर जोपर्यंत तो वचनाला नाकारतो तेव्हा मानसशास्त्र चुकीचे आहे. तो अस्पष्ट नाद देतो. सर्वकाही नाहीसे होईल पण देवाचे वचन येशूने तसे म्हटले "आकाश व पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वचने कधीच नाहीशी होणार नाही." म्हणून, तुम्ही पाहा, आपण वचना – बरोबर, त्याची वाणी बरोबरच राहिले पाहिजे.

65 गोंधळात पाडणाऱ्या पुष्कळ गोष्टी! लोक उठतात, ते वचन ओळखीत नाही आणि ते अशा गोष्टी बोलतात, आणि त्यांना त्या योग्य वाटतात. साम्यवाद अगदी योग्य आहे, "सगळे सारखेच आहेत. आता अगदी कोणीही भांडवलदार नाहीत, सगळे साम्यवादीच आहेत." असा विचार करण्यास तुम्ही कधी थांबविले का की हे, साम्यवाद हे खोटे संजीवन आहे? ह्या सगळ्या गोष्टी वरहुकुम बनवीत आहेत? त्या...येशूने म्हंटले, "दोन्ही आत्मे इतके सारखे असतील की शक्य होईल तर निवडलेल्यास ही फसवावे." आणि जे काही सैतानाकडे आहे ते जे देवाने निर्माण केले आहे त्याचे विद्रुप स्वरूप आहे. पाप हे—हे नितीमत्वाचे विद्रुप स्वरूप आहे. खोटे म्हणजे सत्य विकृत रीतीने मांडणे हेच आहे. व्याभिचार ही—ही अशी कृती जी देवानी जी आज्ञा दिलेली आहे त्याचा विपरीत. सर्व अविश्वास म्हणजे विश्वासाला विकृत करणे. त्या—त्या पतित गोष्टींचा स्विकार त्या—त्या करण्यासाठी तुम्हाला सत्य नाकारावे लागते. पाहा, ह्या वाण्याकडे लक्ष द्या, त्यांची वचनाद्वारे परीक्षा करा आणि पारखा की ते सत्य आहे ना.

66 ओ, अशा प्रकारच्या वाण्यांवर आपण कसे पुढे आणि पुढे जाऊ शकतो, परंतु आपला वेळ निघुन गेला आहे परंतु अशा पुष्कळ वाण्या की लोकांना काय करावे ते कळत नाही – जो मेथॉडिस्ट आहे तो शेवटी बाप्टिस्ट प्रचारकाचे ऐकेल, ते तेथे जातील तेथे थोडया वेळासाठी राहील आणि मग लुथरनकडे जाईल आणि मग पेंटेकोस्टलाकडे, त्याच्या वेगवेगळ्या संघटना आहेत, एक दुसरीकडे पळतो, दुसरा दुसरीकडे, नंतर परत फिरतो आणि असेच पुढे तुम्ही स्थिर नाही हेच ह्यातून दिसते. त्याची वाणी एका! येथे ती आहे लिखित स्वरुपात, ती वाणी, वाणी प्रस्थापित होईल जर ती सत्य असली तर.

67 जगातील मंडळीला काय करावे ते ठाऊक नाही, राजकारणी जग अनागोंदी दिसते. माणसे येथून पळतात, काहीतरी गोष्टी उठतात एखादा जॅकेट, एखादा कोट. जेव्हा मी

रोममध्ये होतो, त्याच्या कडे एकोणीस वेगवेगळे खिळे दर्शविले होते. जे येशूच्या हातात खिळले होते. आणि तेथे तर फक्त तीन होते, तरी परंतु त्याचाकडे त्या एकोणीस प्रकारच्या खिळ्यांची नोंद आहे. आता, कोणाकडे खिळे आहेत ह्या गोष्टीने काय फरक पडतो? ख्रिस्ताने आपल्यासाठी खिळे ठेवले नाही की आपण पूजा करावे, त्याने आपल्यासाठी त्याचा वचनाद्वारे पवित्र आत्मा ठेवला. "विश्वास ठेवणाऱ्याबरोबर ही चिन्हे असत जातील, त्याच्याकडे खरे खिळे असतील"? त्यांच्याकडे असेल...विश्वासणाऱ्याबरोबर ही चिन्हे असतील, मी सुरुवात केलेल्या संप्रदायाला ते जडून राहतील. त्याने कुठल्याच संप्रदायाची सुरुवात केली नाही. पाहा, ही वाणी कशी विरुद्ध आहे?

68 परंतु विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील ते माझ्या नावाने भुते काढतील. तेथे वचन आहे. "ते नव्यानव्या भाषा बोलतील सर्प उचलतील व कोणताहि प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही. त्यांनी दुखणाइतांवर हात ठेविले म्हणजे ते बरे होतील आणि ह्या गोष्टी पाहा आणि उर्वरित सगळे वचन एकत्र करा.

69 आता, फक्त ह्या गोष्टी ते प्रस्थापित करीत नाही, मुळीच नाही. तेथेच आम्ही पॅन्टेकोस्टल चुकीच्या मार्गाने जातो. येशूने म्हटले नाही का, "त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, प्रभो, प्रभो, आम्ही तुझ्या नावाने संदेश दिला, तुझ्या नावाने भूते घालविली, व तुझ्या नावाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय? तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगने की मला तुमची कधीच ओळख नव्हती, 'अहो अनाचार करणाऱ्यांनो माझ्यापासुन निघून जा.' माझ्या बहिणींनो आणि भावांनो तुम्हाला समजते का की का मी ह्या पीढीचा विरोध करतो आणि दोषारोप करतो? तुम्ही माणसांच्या व देवदूतांच्या भाषा बोलू शकता तुम्ही चर्चभोवती आत्म्यामध्ये नाचू शकतात, त्याचा ह्याच्याशी काही एक संबंध नाही.

70 मी मुसलमानांना असे नाचताना पाहिले आहे. मी वैद्य...चेटकीनींच्या छावण्यात मी चेटकीणीना उभे राहून अन्यभाषा बोलताना आणि त्याचे भाषांतर करताना पहिले व ऐकले आहे. आणि पुढे होणाऱ्या गोष्टी त्या जसेच्या तसेच सांगतात. आणि त्या तशाप्रकारे घडल्या. मी असेही पहिले आहे की पेन्सिल उठुन अन्य भाषांमध्ये लिहते आणि ते फक्त सैतानच वाचू शकतो. तुमचे सार्वकलिक ध्येय ह्या अशा संवेदनशिल गोष्टींवर उभारू शकत नाही. सैतान ह्या संवेदनशिल गोष्टींपैकी कोणत्याही एकाची नक्कल करू शकतो. नाही... ख्रिस्ताला ओळखण्याद्वारे काहीतरी तुमच्या जीवनात बदल घडतोच. तुमचे जीवन पाहा आणि वचनाप्रमाणे जीवनाला वळण लावा आणि पाहा तुम्ही कुठे आहात. निश्चित यादी करा व तपासणी करा.

71 सर्व प्रकारची नक्कल, खोटया वाण्या, खोटे संदेष्ट, अशा अनेक गोष्टी उदभवत आहे, येशूने तरी म्हटले, ह्या सर्व गोष्टी असूनसुद्धा "जर कोणी मनुष्य माझी वाणी एकले आणि मला अनुसरील." तो वचन आहे. ऐका, त्याची आपल्यासाठी आज ह्या अनेक वाण्याच्या समयात हीच सेवकाई आहे. मी म्हणतो ह्या सर्व वाण्या बाहेर काढण्यास खूप वेळ लागेल. ती लोकांसाठी गोंधळविणारी व कांटाळवाणी गोष्ट आहे.आणि ह्यानंतर तुम्हाला दुसरी संधी मिळणार नाही. ती तुम्ही आताच घेतली पाहिजे कदाचित तुम्हाला आज रात्री संधी मिळणार नाही.कदाचित उदया तुम्हाला ही संधी मिळणार नाही ती आताच आहे! "जेव्हा तुम्ही वाणी ऐकत आहात तेव्हा आपली अंतकरणे कठीण करू नका, जसे चिथवणीच्या दिवसात होते. आता हीच वेळ आहे ही योग्य वेळ आहे का जर कोणी मनुष्य माझी वाणी ऐकेल" हे हीच वेळ दाखवत आहे त्याची वाणी आजही ह्या अनागोंदीच्या दिवसात येत आहे. तो आजही वाणी देत आहे! का? त्याची वाणी सदैव राहील ती येथे आहे. "आकाश आणि पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वाणी नाहीशी होणार नाही" त्याची वचन.

72 आणखी पाच मिनीटे, पटकन. आणखी थोडा वेळ तुम्ही थांबाल का किंवा काही मिनीटे? मी घाई करीन.आपण पाहूया की कोणी ही वाणी ऐकली आणि तिचे आज्ञापालन केले. अशाप्रकारे तीने त्यांना करायला लावले, त्यांना काय करायला लावले. आता मी काही—काही वचने गाळणार आहे तुम्हाला सरळ तेथे नेतो की कशाप्रकारे त्यांच्या जीवनाचे परिवर्तन केले आणि जे सगळे त्याच्या सभोवती होते ते कसे विक्षिप्त व्यक्ती झाले आपण त्यांना विक्षिप्त किंवा चक्रम व्यक्ती म्हणतो. ज्या प्रत्येक मनुष्याने देवावर विश्वास ठेवला त्याला "चक्रम व्यक्ती" असे समजण्यात आले कारण जर तुम्ही जगाच्या चालीरीतीप्रमाणे चालता, तर तुमच्यात काहीतरी चुकीचे आहे.एक ख्रिस्ती असण्यासाठी तुम्हाला विक्षिप्त किंवा चक्रम व्यक्ती व्हावे लागेल. "कारण सगळे जे ख्रिस्त येशूमध्ये पवित्र, सुभक्तीचे जीवन जगतात त्यांना जगाच्या छळास समोरे जावे लागते. तो जगात होता, आणि जग त्याच्या द्वारे निर्माण झाले आणि जगाने त्याला ओळखले नाही." मी संपवित असताना तुम्ही लक्षपूर्वक ऐका.

73 आदामाने त्याची वाणी संध्याकाळच्या समयी ऐकली, आणि त्याच्याबरोबर सहभागिता केली आदामावर काहीही दोषारोप नव्हता.त्याने देवाची वाणी ऐकली, आणि तो बोलला, पित्या परमेश्वर देवाने त्याला गाढ निद्रा आणिली, "आणि तो झोपला आणि हव्वा त्याच्या जवळ.सिंह, वाघ आणि हिंस्त्र पशू. त्याच्या सभोवती असत, तेथे काही हानी नव्हती, आजारी पडण्याचा कुठलाही मार्ग नव्हता भटकणे नव्हते जर तो सकाळी उठला.ते सकाळी उठत असत. आदामाने त्याची वाणी ऐकली ज्याप्रकारे त्याने ती ऐकावयास हवी होती.

74 परंतु एके दिवशी त्याने त्याच्या पत्नीची वाणी ऐकली. त्याने चुकीची वाणी ऐकली, जरी ती त्याच्या पत्नीची होती, पृथ्वीवर सर्वात जवळची संबंध असलेली तो का इयोबाप्रमाणे बोलला नाही, "तू एका मूर्ख स्त्रीप्रमाणे बोलत आहे"? आणि जर तसे झाले असते तर सर्व मानवजात मृत्यूएवजी, जिवंत राहिली असती. त्यामुळे मानवजातीचा ओघ आणि काळ बदलला. पण त्याने देवाची वाणी ऐकली. त्याने त्याच्याबरोबर सहभागिता केली, पण जेव्हा तो वळला...त्याची पत्नी चूक करीत आहे हे त्याला कसे कळले? लक्षात घ्या, ते आनंददायक होते.

75 आज आपणाला असे–वाटते–की आपली संघटना, आराधनालय, आपली भरभराट म्हणजे देव आपल्या विषयी आनंदी आहे. ते दिसायला चांगले आहे. जेव्हा मीखाया चारशे संदेष्ट्यासमोर उभा राहिला, आणि तो पूर्ण देश त्यांचा होता आणि सर्व पालिष्टी त्यांच्या विरुद्ध होते किंवा अशूरीही, हे सर्व चांगले भासत होते. ते संदेष्ट सांगत होते, "चढाई करून जा; प्रभू ते राजांच्या हाती देईल. परंतु ती देवाची वाणी नव्हती. मीखाया वळला आणि त्या वाणीला त्याने शाप दिला. आणि असे करावे हे त्याला कसे कळले? कारण त्याचा दृष्टांत अगदी वचनाप्रमाणे होता. हाच एक मार्ग आहे ज्यावर विश्वास ठेवला पाहिजे आणि आज आपला विश्वास वचनावरच असला पाहिजे

76 तुम्ही पहिले का? आदामाने देवाची वाणी ऐवजी दुसरी वाणी ऐकली त्याच्या स्वतःच्या बायकोची...मंडळी तिच्या संघटनेची वाणी ऐकत आहे. त्यांच्यात देवाच्या वचनाऐवजी त्यांच्यात रितीरिवाज घालीत आहेत. त्यांना त्यांच्या मनास वाटेल तसे वागू देत आहेत. जोपर्यंत ते मंडळीत जातात आणि मंडळीचे सभासद आहेत, त्यांच्यासाठी त्याच गोष्टी महत्वाचा असतात. ह्या जगातील विश्वासणाऱ्यांची त्यांच्या मंडळीशी जवळचा संबंध असतो. परंतु एका खऱ्या विश्वासणाऱ्या व्यक्तीचे पवित्र आत्माशी देवाच्या वचनाशी अगदी जवळचे नाते असते.

77 म्हणून आपल्याला कळते की आदामाला त्याची स्थिती कळली आणि पुन्हा त्याला देवाची वाणी आली, आणि तेव्हा त्याने अंजिराची पाने आपणासाठी शिवून घातली होती. परंतु ह्या वेळेसे ही वाणी दोष देणारी होती. “तु हे काय केलेस?”

78 मला आश्चर्य वाटते की आज अमेरिका किंवा संपूर्ण जग धार्मिक गोंधळात आहे आणि अमेरिका त्यात गिळली जात आहे. लवकरच ती एक धार्मिक राष्ट्र म्हणून द्रष्टिपथास येईल. [ध्वनिमुद्रणपट्टीवर रिक्त भाग—संपा.]

79 माझ्यापुढे कोण बसले आहेत? मला माहीत आहे टेप होत आहे आणि हे सर्व जगभर जाणार आहे. आपल्याकडे ध्वनिमुद्रित केलेल्या टेप ऐकण्याच्या कार्यक्रम आहे. ह्यासाठी प्रत्येक संदेश सर्व जगापर्यंत, सर्व इतर राष्ट्रे ह्यापर्यंत पोहोचावा.

80 आता जर तुम्ही पाहाल आणि तुम्हाला कळेल की तुम्ही अंजीराची पानाच्या वेष्टणात आहात. जेंव्हा देवाची सत्य वाणी येते, त्यांना माहीत नाही की त्याचे काय करावे. ते गोंधळात आहेत, त्यांनी काय करावे हे त्यांना कळत नाही.

81 त्वरित नोहानी देवाची वाणी एकली. ती त्याच्या जीवाच्या रक्षणासाठी त्याला तयार करीत होती, आणि त्याने त्याच्या सुचनांचे अवलंबन केले आणि तो उभा राहिला

82 जर एखादा मनुष्य देवाची वाणी एकतो...नीट ऐका, येथे चांगल्याप्रकारे लक्ष दया विचलीत होऊ नका. जर हे सिद्ध होते की ती देवाची वाणी आहे, आणि ज्यावेळेस ती त्या मनुष्याकडून ती पुढे जाते, आकाश व पृथ्वी नाहीशी होतील पण ती वचने नाहीशी होणार नाही.

83 नोहाने ती वाणी ऐकली आणि जगाचा, निषेध केला, आणि ते नोहावर हसले कारण त्याचा—त्याचा संदेश त्या युगातील वैज्ञानिक निष्कर्षा बरोबर जुळत नव्हता. परंतु तेव्हा पाऊस पडला आणि संपूर्ण जगाचा नाश झाला. पाहा? त्याची वाणी जी पुढे आली, त्याचे बीज त्यात होते. प्रत्येक युगात हे अशाच प्रकारे झाले.

84 शमुवेलाला, सुचना मिळाली जेव्हा त्याने देवाची वाणी ऐकली, की त्याने...पुढे जाऊन एलीचा निषेध करावा किंवा दोष दाखवावा, तो मनुष्य ज्याने त्याचे संगोपन केले. तो मनुष्य जो त्याच्यासाठी पिता होता आणि त्यास वाढविले आणि त्याचे पालनपोषण केले.

85 सेवकभावांनो, मी बोलू का? सेवक कित्येक वेळा, संप्रदायाच्या कारणामुळे आणि रितीरीवाजापुढे संघटना जिने त्यांचे संगोपन केले, पालनपोषण केले आणि त्यांना वाढविले आणि मंडळीत आणले, तुम्हाला त्यांनी शिकविलेला गोष्टी सोडाव्या लागतील. पाहा? किती भयंकर गोष्ट असेल एका खऱ्या देवाच्या सेवकासाठी की त्याने देवाची वाणी ऐकावी आणि त्याच्या त्या माता संघटनेच्या शिकवणूकीतून मागे फिरावे म्हणावे “तुझा निषेध करतो कारण तू देवाच्या ह्या वचनाचा स्विकार करीत नाही.” कशा गोष्टी, हे शमुवेलासाठी कठीण होते.

परंतु तो संदेष्टा होता, त्याला ते केलेच पाहिजे ह्या गोष्टीचा विचार न करता की ह्या व्दारे तो दुखावला जाईल किंवा नाही, त्याला ते कसेही केलेच पाहिजे.

86 मोशेने देवाची वाणी ऐकली. तो देवाविषयी ज्ञानात पूर्ण पारंगत होता. त्याला त्यामधील सर्व *अधिक* आणि *उणे* ठाऊक होते, पण ते व्यर्थ झाले त्याने देवाची वाणी ऐकली, मोशे होता तसा राहिला नाही.

87 कोणीही मनुष्य तसा कधीही नसतो. तुम्ही तुमच्या् कानाने वाणी बोलताना ऐकू शकता. परंतु जेव्हा तुम्ही ह्रदयापासून ती वाणी ऐकता पहा तेव्हा तुम्ही खरे ऐकता. तुम्ही

तुमच्या डोळ्याने पाहत नाही. तुम्ही तुमच्या डोळ्याने पाहता, तुम्ही तुमच्या ह्रदयाने पाहता. तुम्ही काही पाहता, म्हणता, "मी तर काही पाहत नाही," म्हणजे तुम्हाला ते समजत नाही असा त्याचा अर्थ असतो. तुम्ही तुमच्या कानाने ऐकत नाही तर तुम्ही तुमच्या ह्रदयाने ऐकता. कित्येक वेळा तुमचे कान देवाची सत्यवाणी कानाने ऐकतात, आणि ती तुमच्या मधून निघून जाते. ज्याप्रमाणे बदकाच्या पाठीवरून पाणी निघून जाते. परंतु जेव्हा तुम्ही खरोखर ऐकता, तेव्हा ते तुम्ही ह्रदयाने ऐकता.

88 आणि मोशे सर्व देवविषयक ज्ञानात तरबेज होता परंतु त्याने देवाची वाणी ऐकली नव्हती पण एके दिवशी ऐंशी वर्षाच्या मेंढपाळास देवाने एके ठिकाणी बोलावले आणि त्याच्याशी तो बोलला आणि तेव्हा त्याला समजले कि तो देव होता. पहिली गोष्ट त्याने मोशेबरोबर केली ती म्हणजे त्यांच्या वचनाची सत्यता शाबित केली म "मी खाली जात आहे, मी केलेले अभिवचन मला ठाऊक आहे."

89 आणि हेच वचन त्याने ह्या अंतिम दिवसात दिले आहे. तो त्याचे लोक परराष्ट्रीयातून बाहेर काढील आणि त्याची सर्व वचने.

90 "हे मी वचन दिले आहे?" म्हणाला, "मोशे तू आपल्या पायांतले जोडे काढ." दुसऱ्या शब्दांत त्याचा आदर कर. "तुझी शुष्क काठी जमिनीवर टाक" आणि वाळवंटातील एक—एका शुष्क काठीचा साप झाला आणि मोशेने तो धरिला, आणि तो त्या सापाची त्याच्या हातात परत काठी झाली. पाहा? त्याला माहित होते कि तो देव आहे, कारण देव बोलला देवाचे वचन, वचन जे देव बोलत होता, देवाने म्हटले तुझ्या हातातली काठी जमिनीवर टाक तो देवाचा शब्द आहे. तुम्ही अशा गोष्टी करण्याचा प्रयत्न करू नका जे तुमच्यासाठी देवाचे वचन नाही ते मोशेसाठी देवाचे वचन होते. *हा* तुझ्यासाठी देवाचा शब्द आहे! "काठी जमिनीवर टाक." तिचा साप झाला. परमेश्वराने मोशेस सांगितले, "तु घाबरला आहेस का? आपला हात पुढे करून त्याचे शेपूट धर," आणि तो त्याची पुन्हा काठी झाली. त्याच्यासाठी देवाचा शब्द त्याने काय केले? देवाने त्यांचा शब्दाची सत्यता शाबित केली.

91 काही महिन्यापूर्वी मला ऐक फोन आला, जवळ – जवळ वर्ष झाले, वर्षाहून आधिक ऐक स्त्री एका बाप्तीस्ट प्रचारक आणि एक पेनटेकोस्टल प्रचारका बरोबर असताना फोनवरून बोलले. ती म्हणाली "भाऊ ब्रॅन्हम देवाने मला एक संदेष्टी केले आहे.

मी म्हणालो, "ठीक आहे."

92 ती म्हणाली, "तुम्हाला माहीत आहे मला सांगितले आहे की तुम्ही म्हणालात तुमच्याकडे ते ध्वनीमुद्रित आहे की माझी सेवकाई देवापासून आहे.

93 मी तसे करू शकत नाही, ते वचनाविरुध्द आहे, म्हणून मी म्हणालो, "बाई ती एक चूक आहे. मी तुला ओळखीतही नाही."

94 आणि बाप्तीस्ट प्रचारक म्हणते, मी त्याला असे बोलताना ऐकले आहे, पेनटेकोस्टल प्रचारका ने ऐकले आहे. ती म्हणाली, "ठीक आहे, मी एक सभा आयोजित करीत आहे." आणि म्हणाली, "देव अदभूत गोष्टी करीत आहे."

95 मी म्हणालो, "त्यासाठी मी देवाचा ऋणी आहे" ती म्हणाली..., मी म्हणालो, "देव तुझ्याशी असे काही आजपर्यंत बोलला आहे का"

ती म्हणाली, "हो, माझ्या हातात ऐक मोठा कार्यक्रम आहे."

96 मी म्हणालो "आश्चर्यकच, मी म्हणालो तुझा कार्यक्रम काय आहे?" मी म्हणालो प्रभुने तुला काय सांगितले?

97 तो म्हणाला, "*अमुक–अमुक* तारखेला फिनिक्स, ॲरीझोना येथे जा, आणि तेथे मी तुला हरवलेला डचमॅन सोन्याची खाण देणार आहे आणि तेथे मिळालेलेते सोने तू घेणार आहेत. आणि त्याद्वारे तू संपूर्ण जगात मिशनरींची प्रायोजक बनणार आहेस" जेव्हा आपल्याला सर्वांना ठाऊक आहे की हरवलेली डचमॅन खान ही एक पुराण दंतकथा आहे. "असे तो बोलला."

98 मी तिला म्हणालो, "ठीक आहे, मी तुला सांगतो की ह्या गोष्टी देवापासून आहेत किंवा नाही हे कसे शोधायचे?" मी म्हणालो, "तू त्यादिवशी तेथे जा आणि जर तुला तेथे हरवलेली डचमॅन खान सापडली तर ते देवापासुन आहे. जर तुला ती हरवलेली डचमॅन खान सापडली नाही तर पश्चाताप कर आणि तो खोटा आत्मा तुझ्यातून काढून टाक." अशाप्रकारे हे देवापासून आहे किंवा नाही हे तू समजू शकते.

99 देव म्हणाला, "मोशे काठी जमिनीवर टाक, आणि तिचा साप होईल" त्याने तसे केले तो म्हणाला "ती उचल आणि ती पुन्हा काठी होईल." त्याने तसे केले.

100 जेव्हा देव ह्या अंतिम दिवस सेवकाईचे वचन देतो तो ते जसे बोलले आहे तसेच्या तसे करून स्थापित करतो. तेव्हा तुम्हाला कळते तुमच्याकडे सत्य वाणी आहे. तुम्ही सत्य गोष्ट ऐकत आहात, कारण ते स्थापित झालेले देवाचे वचन आहे. पाहा? ओह, कसे... मला क्षमा करा, मी...ठीक आहे.

101 मोशे वेगळ्या तऱ्हेने वागत होता. पाहा मोशे विचित्र गोष्टी करीत होता. नेहमीच जेव्हा तुम्ही देवाची वाणी प्रमाणे चालता, जगासाठी तो वेडेपणा असतो. दुसऱ्याच, दिवशी मोशे आपली पत्नी आणि लेकरे ह्यांना गाढवावर तेथे जाऊ लागला. तो वृध्द मनुष्य ज्याची दाढी खाली *अशी* लोंबकळत होती आणि डोक्याचे टक्कल पडले होते, हातात काठी घेऊन गाढवाला हाकीत थेट मिसर देशांस लगबगीने जावयास निघाला कोणीतरी विचारले, "मोशे तू कोठे जात आहेस?"

102 मिसर देशात काही गोष्टी मिळविण्यास जात आहे. जेथे तो एक तरुण असताना अयशस्वी ठरला होता. एक शूर योध्दा म्हणून तो अयशस्वी ठरला होता, पण येथे तो तो खाली जिंकून घेण्यासाठी जात आहे आणि त्याने ते केले. का? त्याने देवाची वाणी ऐकली आणि ती त्याच्या दिवसात पूर्ण होताना पाहिली ज्या गोष्टी त्याच्या दिवसात घडणार होत्या. त्या त्याने घडताना पाहिल्या.

103 पॉल, स्वशैलीने बनलेला परुशी, देवाविषयक शास्त्रात पारंगत असलेला, परंतु एके दिवशी त्याने देवाची वाणी ऐकली. त्याने अग्नीस्तंभ पहिला आणि त्याला समजले हे काहीतरी वेगळे आहे. तिथेच त्याचे जीवन पालटले. कित्येक परुशी, "तू चुकत आहेस तू चुकत आहेस." गमेलीयन्स पौला विषयी ओरड करू लागले परंतु त्याने त्याची परवा केली नाही. पॉलने देवाची वाणी एकली तो जाणत होता की तीच सत्य आहे.

104 पेत्र अतिशय धार्मिक वडिलांचे संप्रदाय किंवा चालीरिती पाळणारा, तो मांस खात नसे.नाही महाशय तो त्याविषयी जराही कसूर करीत नसे. तो खरोखरीच वडिलांचा संप्रदाय पाळीत असे; वचनाप्रमाणे चालीत असे, मग काय झाले? एके दिवशी त्याने देवाची वाणी ऐकली, "देवाने जे शुद्ध केले आहे ते तू निशिध्द मानू नको" तो नवा मनुष्य झाला. तो जेथे त्याला देव पाठवी तेथे जाण्यासाठी तयार झाला.

105 संपविताना, मी सांगू हे इच्छितो. तेथे एके काळी एक मनुष्य होता जो विश्वासी होता. तो कबरेत होता. त्याला मरून चार दिवस झाले होते. दुर्गंधी सडलेल्या कुजलेल्या. आणि जर ती मनुष्याला मेलेल्यातून व कुजलेल्या अवस्थेतून उठवते तर ती मंडळीला काय करील जिच्यात अजुनही जीवन आहे? ती त्यांना पुनरूत्थित करील, ह्या निरनिराळ्या

वाण्यांच्या गोंधळात ज्याविषयी आपण बोललो, धार्मिक, राजकारणी, हॅालीवूड, खोट्या भविष्याच्या आणि अशा गोष्टी ज्या निघत आहे, ह्या सर्वांच्या मध्ये, देवाची सत्यवाणी त्या मनुष्याला परत जीवनाकडे बोलवील जो पापात व उल्लंघनात मृत झाला आहे. ती नक्कीच पतित झालेल्या मंडळीला पुन्हा जीवनाकडे बोलवील.

106 लक्षात ठेवा संपविण्याचा आधी मी हे सांगू इच्छितो, आणि मग मी संपवीन. येशूने म्हटले, "अशी वेळ येत आहे, जेव्हा सर्वजण जे कबरेत, आहेत ते देवाची वाणी; ऐकतील" आणि तुम्ही ती ऐकणार आहात तुम्ही कशाही स्थितीत का असा, तुम्ही ती वाणी ऐकणारच. आणि काही जण जे कबरेतून बाहेर येतील ते न्यायासाठी नेमलेले असतील. त्यांनी वाणी ऐकली, पण ती न्यायासाठी होती. आणि जर ती तुम्ही आज एकता, "आज खूप वेळानंतर जेव्हा तुम्ही माझी वाणी ऐकता," तुम्ही आपली अंतःकरणे कठीण करू नका, जशी तुम्ही ती चिथावणीच्या दिवसात केली. "आणि जर तुम्ही पेनटेकोस्टल लोक स्वतःला संघटीत करून आपण मानलेल्या तत्वांना पुन्हा गुरफटून घेत आहात, संसारिक गोष्टीत सुभक्तीचे बाह्यरूप धारण करतात आणि त्याचे सामर्थ्य नाकारतात," तुम्ही पुनरुत्थानाच्या वेळी न्यायासाठी उठविले जाण्याअगोदर, कारण देवाची वाणी जी तुमच्याशी आज वचानाद्वारे बोलत आहे त्यादिवशी तुमचा न्याय करील.

107 जर तुम्ही आज फक्त आस्थाहीन विश्वासी आहात तर देवाची वाणी आज ह्या सकाळी तुमच्या हृदयात आवाज देत आहे, "तू कोमट विश्वाशी आहे." तू पश्चाताप करशील तर बरे होईल!

108 तुम्ही पुरुष, स्त्रीया, मुले किंवा मुली जे ख्रिस्ता साठी जगत नसतील, आणि जर देवाची वाणी त्याच्या वचनाद्वारे तुमच्याशी बोलत आहे. आणि सांगत आहे, "हे करणे थांबवा", तुम्ही हे करा कारण ती तुम्हाला एके दिवशी पुन्हा ऐकण्यास मिळेल, आणि ती तुमचा न्याय करील. तुम्ही ती नाकारू शकत नाही, ती तुमच्याशी या समयी बोलत आहे. आणि लक्षात ठेवा, ती ध्वनिमुद्रित केली जात आहे.

109 आणि जे ही वाणी ऐकून स्वतःला नीट करतील ते नीतीमत्वात, महिमेत स्वर्गात घेतले जातील.

110 तुम्ही देवाची वाणी कधीतरी ऐकणार आहात. कदाचित पुसटशी आज ह्या सकाळी ती तुमच्या हृदयाशी बोलेल, की तुम्ही तुमच्या मार्गात जेथे चालत आहात त्यापासून पुन्हा वळाल. आता लक्षात ठेवा की ते ती वाणी जी तुमच्या अंतकरणाशी बोलत आहे ती स्वर्गात ध्वनीमुद्रित करतील आणि एके दिवशी जेव्हा येशू तुम्हाला बोलाविल, आणि ते सर्व जे कबरेतअसतील, सगळे चांगले आणि वाईट, सर्व उठविले जातील, आणि तेव्हा हीच वाणी तुम्हाला परत ऐकवली जाईल, "फिनिक्स, अॅरीजोना येथे, *एके* रविवारी सकाळी, एका सेवकाने तुम्हाला एवढा वेळ बसण्यास लाविले, त्या वाणी विषयी बोलत, मी तुमच्याशी बोललो. तुम्हा स्त्रीयांना मी सांगितले की तुमचे केस वाढू द्या अन अनेतिके पोशाख करण्याचे सोडून द्या. पुरुषांना सांगितले की खोटे बोलणे. धुम्रपान करणे सोडून द्या, प्रचारकांना सांगितले की देवाच्या वचनाकडे वळा." मी काय बोलत आहे ते समजून घ्या? हे बरोबर आहे.

ती संथ वाणी म्हणत आहे "हे बरोबर होऊ शकते."

111 जर मला निकेदमासारखे यावे लागले तरी मी अजूनही तेथे जाण्याचा प्रयत्न करीन. मी त्याच्याकडे जाईन आणि म्हणेन, 'हे आणि कुठेतरी वाळवंटात जाईन आणि म्हणेन', हे प्रभू, मी येथे आहे, मला आता बदल. मला तुझ्या इच्छेप्रमाणे घडव. "वचनांकडे परत या. जेथे कुठे गुंफलेली एक साखळी जशी फार मजबूत असते परंतु तिचे सुटे भाग फार अशक्त

असतात. तुम्हाला वाटते की तुम्ही वचनापासून दूर जात आहात, लगेच वचनांकडे परत या, कारण आणि तुमच्या जीवनात कुठेही तुम्ही संप्रदाय पाळण्यासाठी, देवाची आज्ञा सोडली, तेथेच तुमची साखळी तुटेल जरी इतर गोष्टींवर, कितीही भक्कम असाल तरी तुम्ही देवाच्या न बदलणाऱ्या हाताला पकडा.

112 आपण प्रार्थना करूया आज, खूप वेळा नंतर हे प्रभू, तु म्हणालास की मी बोलेन तु आपले नियम आमच्या हृदय पटलावर लिहिले. मला ठाऊक नाही की पुढे माझ्यासाठी काय आहे. फक्त एकच गोष्ट करणे मला ठाऊक आहे ती म्हणजे देवाचे वचन घेणे आणि त्याचा प्रसार करणे, ते वचन खडकाप्रमाणे पकड घ होईल मी प्रार्थना करतो, की देवा तू प्रत्येक तरुणाशी, प्रत्येक मध्यमवयी, वृध्दाशी मग कोणीही असो त्याच्याशी तू बोल. हे प्रभू, माझ्या हृदयाशी बोल. ह्या सेवकांच्या हृदयाशी बोल मंडळीतील सर्वांच्या हृदयाशी बोल.

113 आम्ही प्रार्थना करतो की, हे पित्या आज आम्ही तुझी वाणी ऐकू आणि आम्ही पाहतो, जसे शमुवेलाच्या दिवसात होते, त्याचे दृष्टांत दुर्लभ होते आणि ते लोकांना अस्वस्थ करीत असत. तसेच आजही आहे. आपल्याकडे स्वप्न आणि स्वप्नदर्शी आहेत, आपल्याकडे बोलणारे आणि भाषांतर करणारे आहेत, परंतु दृष्टांत देवाच्या वचनाद्वारे येतात, आणि सुधारणा करतात...हे स्वर्गीय पित्या आम्ही प्रार्थना करतो की ती वाणी जी अरण्यात ओरडत होतो, "परमेश्वरासाठी मार्ग सिद्ध करीत होती", आम्ही विश्वास करतो की पवित्र आत्मा आम्हास ती वाणी आज पुन्हा देत आहे, "प्रभूच्या येण्यासाठी मार्ग सिद्ध करा!" आणि ती वाणी विचित्र आहे, 'कारण तेथे अनेक दुसऱ्या वाण्या आहेत ज्या ह्या वाणीला बधीर करीत आहेत आणि नष्ट करीत आहे, परंतु ते धन्य आहेत ज्यांचे कान ती ऐकत आहेत. मी प्रार्थना करितो की पवित्र आत्मा आता आपल्या सर्वांच्या अंत:करणात कार्य करो.

114 आणि आपली मस्तके झुकवित असताना आणि मी भरवंसा करतो की आपली अंतकरणे झुकलेली आहेत जर तुम्हाला वाटते तुमच्या जीवनात कु ठे तरी आज्ञा केली आहे, तुम्हाला वचन माहीत असताना, तुम्हाला ठाऊक असताना की ती पवित्र शास्त्राची शिकवण आहे तरी तुम्ही त्या वाचनाशी सहमत झाला नाहीत, दुसरे काहीतरी करण्यास भाग पाडले. तुम्ही सेवाकांनो तुम्हाला काही गोष्टी वचनात मिळाल्या असतील ते खरोखरीच सत्य आहे परंतु तुम्हाला असे वाटले की तुम्ही जर त्या गोष्टी शिकविल्या तर तुमची संघटना तुम्हाला बाहेर काढून टाकेल आणि तुम्हाला माहीत आहे की हे परमसत्य आहे. लोकांनो जे तुम्ही चुकीच्या गोष्टी घेता, चुकीचे जीवन जगता. तुम्ही वडिलांनो आणि आईंनो जे तुम्ही आपल्या मुलांना सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत नाही त्यांना योग्य तऱ्हेने वाढविण्याचा प्रयत्न करा, आणि ते कसेही जगाकडे जातील, जर तुम्ही त्यांच्यापुढे आदर्श ठेवींत आहात. आणि जर तुम्ही हे करत नसाल देवाची वाणी तुमच्याशी बोलत आहे, "तसे तुम्ही करू नका"

115 आणि आता प्रत्येक जण आपले मस्तक झुकवूया आणि सगळे डोळे मिटूया आणि स्वर्गीचा परमेश्वर त्या व्यक्तीच्या हृदयात पाहो जो भुकेलेला आहे आणि तेथे कुठे चुकले आहेत त्यांच्यामध्ये जागा मिळो आणि देवाकडे हात पसरुया सांगूया "प्रभो, मी खरोखर तुझ्या वाणीची इच्छा धरतो ह्यासाठी सर्व अविश्वास, आणि सर्व गोष्टी ज्या तुझ्या आवडीच्या नाही त्या काढून टाक, आणि जसे तुला वाटते त्याप्रमाणे मला घडव." तुम्ही आपले हात वर करा प्रभू तुम्हाला अशीवार्दीत करो. तुम्ही केले असताना...परमेश्वर आशीर्वादित करो. परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो.

116 तर पवित्रशास्त्र सांगते येशू म्हणाला, आणि ह्या सर्व इतर वाण्या असूनसुद्धा, “जर मनुष्य अजुनही माझी वाणी ऐकेल” त्याचे अनुकरण करा, तुमची इच्छा पूर्ण होईल.

117 प्रभो वेळ निघून जात आहे परंतु पवित्रशास्त्र सांगते की, “जितक्यांनी विश्वास ठेवला, त्यांचा बाप्तिस्मा झाला.” मी प्रार्थना करतो स्वर्गीय पित्या, ज्या प्रत्येकाने खऱ्या मनाने गुन्ह्यांची कबुली देण्याकरिता त्यांचे हात उभारले आहेत, देवाचे वचन जे त्यांनी वाचले आहे, आणि त्यांना कळले की ते चुकले आहे. मी त्यांच्याकडे पाहात नाही, मी त्यांच्याकडे पाहू नये, तु त्यांच्याकडे पहा, प्रभो ज्यांनी हात उभारले आहेत त्यांचा काय उद्देश आहे हे तुला ठाऊक आहे ह्या वेळेस ते आपल्या अंतकरणात ठरवोत “आजपासून ह्यापुढे, मी देवाचे वचन आणि देवाची वाणी ऐकेन, आणि त्याप्रमाणे अनुकरण करू त्याची कितीही किंमत का मोजावी लागेना.” आणि ते करीत असताना ह्या कवीचे हे गाणे त्यांना मनात ठेवावे, “येशूने एकटयानेच वधस्तंभ वाहावा आणि सर्व जग मुक्त केले जावे? नाही तेथे प्रत्येकासाठी एक वधस्तंभ आहे. तेथे माझ्यासाठी वधस्तंभ आहे. आणि मृत्यूने माझी सुटका होईपर्यंत हा वधस्तंभ मी वाहीन मग जेव्हा देवाची वाणी बोलेल, मी त्याच्ये नितीमत्व धारण करीन, कारण मी त्याची वाणी, त्याच्या शब्दाची वाणी अनुसरली”, मी त्या सर्वांना प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने तुझ्या हाती सोपवितो.

118 आता आपल्या माना झुकलेल्या असताना तुम्ही तुमच्या पापांची कबुली करीत आहात आणि प्रतिज्ञा करीत आहात. मी येथे बसलेल्या लहान मुलाकडे पाहून आश्चर्य करीत आहे जो आपले डोके चहूकडे फिरवीत आहे आणि तेथे मंडळीसाठी वाणी आहे, “मी तुझा देव जो तुझे सर्व रोग बरे करितो.” मंडळीत ही वाणी आली आहे. आणि तुम्ही सर्व जण ज्यांना आरोग्याची गरज आहे आणि जे तुम्ही देवाचे प्रत्येक वचन जे सत्य आहे ते ओळखून त्याप्रमाणे पवित्र जीवन जगात आहात, आणि तुम्हाला आरोग्याची गरज आहे, तुम्ही फक्त तुमचे हात उभारा. तुमचे हात वर करा “हे प्रभो, मला आरोग्याची गरज आहे.” ठीक आहे.

119 आता ती वाणी तुमच्या हृदयात ठेवा, “व मी परमेश्वर जो तुझे सर्व रोग बरे करतो.” लक्षात ठेवा, जेव्हा हे शब्द बोलले जातात, ते त्याप्रमाणे घडते, येशू म्हणाला, मार्क 11:22, “जो कोणी ह्या डोंगराला तू उपटून समुद्रात टाकला जा, असे म्हणेल आणि आपल्या अंत: करण्यात शंका न बाळगत, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दांप्रमाणे घडून येईल.”

120 आता तुम्ही प्रत्येक जण तुमची मस्तके झुकवून आपल्या शब्दात तुमची पापांची कबुली करा, “हे प्रभो मी तुझ्या वचनावर विश्वास करतो. मी तुझी वाणी माझ्याशी बोलताना एकली की तू काल, आज आणि युगानुयुग सारखाच परमेश्वर आहे.” मी खाली जाऊन आणि लहान लेकरांवर हात ठेवत आहे. कारण तो हे सर्व जाणण्यासाठी खूप लहान आहे, मौल्यवान लहान मुलगा, तो उंचीने व वयाने माझ्या लहान जोसेफ सारखाच आहे. आणि माझी इच्छा आहे की तुम्ही सर्व प्रार्थना करीत राहा, प्रार्थनेत राहा, “प्रभो, मी तुझी वाणी ऐकतो. मी विश्वास करतो.

121 स्वर्गीय पित्या, आम्ही हे सर्व श्रोते तुझ्याकडे आणतो ह्यासाठी त्यांच्या शरीराला आरोग्य मिळावे. आणि हे प्रभो येथे एक बिचारा लहान मुलगा, संपूर्ण संदेशभर तो माझे लक्ष वेधून घेत आहे, त्याचे पालक त्या छोटयाशा मुलाला पकडून बसले आहेत. वैदयकीय शास्त्रामध्ये ह्या लहान मुलासाठी काही आशा नाही. तेथे देवाची वाणी आहे जी सर्व गोष्टींवर मात करते. आणि ही मंडळी एकत्र होऊन तुझी आज्ञा पाठवित आहे ज्या कशाप्रकारे

कराव्या हे मला ठाऊक आहे, बाकी सर्व तुझ्यावर सोडतो पित्या मी खाली जात आहे आणि आपले हात त्या मुलावर ठेवत आहे.

122 देव पित्या, प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात, मी ह्याचा निषेध करतो. देवाचे सामर्थ्य देवाचे आरोग्य...तेथे येऊ दे त्याच्यात पुढील पाच मिनिटात असा फरक पडू दे ते सगळे परमेश्वराकडे येवोत, तुझ्या गौरवासाठी

123 स्वर्गीय पित्या, तु वचन दिले आहेस, हेच मला माहीत आहे तू वचन दिले आहे ते घडले आहे, ज्याप्रमाणे तेथे म्हटले आहे "जर तुम्ही ह्यास *म्हणाला*" आणि मी प्रत्येक आजाराच्या किंवा व्याधीच्या दुष्ट आत्मा जो ह्या मंडळीला बंधनात अडकवीत आहे, ह्या लोकांना जखडीत आहे. अविश्वासाचा प्रत्येक आत्मा, मी म्हणतो, "प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात ह्या लोकांमधून निघून जावो!" आपल्याला ठाऊक आहे की हे लिहिले आहे आणि आता बोलले गेले आहे, तसे घडून योवो. देवाच्या महिमे आणि गौरवासाठी प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने मागतो.

124 आता, जे तुम्ही विश्वास ठेवू शकता, आणि विश्वास ठेवता, काय होईल ह्याचा विचार करू नका तेथे बीज टाकले गेले आहे. ती छोटीशी तुमच्यामध्ये, ती वाणी. ह्या मुलाच्या पालकांनो, ह्या मुलाची परिस्थिती काहीही असू दया, तुम्ही विश्वास करा की देवाचे बीज तुमच्या अंतकरणात पडले आहे. तो मुलगा बरा होईल? इतर सर्वांनी एकमेकांसाठी प्रार्थना करा, तुम्ही विश्वास करता की देवाचे बीज तुमच्या अंतकरणात पडले आहे. "माझा आजार नष्ट झाला आहे?" तर विश्वासाची प्रार्थना तुमच्यासाठी करण्यात आली आहे त्याकडे लक्ष ठेवून पुढे जात जा. आणि जर सैतान कधी प्रयत्न करील, तुम्ही सरळ आठवण करा, "येथे स्पेन मंडळीत, त्या रविवारी सकाळी, विश्वासाची प्रार्थना माझ्यासाठी करण्यात आली आहे. आणि देवाने वचन दिले आहे." विश्वासाची प्रार्थना दु:खनाईतास वाचवील आणि प्रभू त्याला उठवील. हे घडेलच. तुम्ही विश्वास करता काय? म्हणा, "आमेन" [मंडळी म्हणते, "आमेन"—संपा] परमेश्वर तुम्हाला आशीर्वादीत करो. आता पुढील सभा मी भाऊ रोजच्या हाती सोपवितो. मला वाटते ते इथे आहे, भाऊ जुवेल रोज परीक्षेनंतर शत्रूचे फाटक काबीज करणे. मला आश्चर्य वाटते तुम्हाला ठाऊक आहे मला एक विचार येतो लोकांना उभे राहताना पाहून जेव्हा वचन वाचले जाते तुम्हाला ते आवडत नाही का? आम्ही आपल्या देशाच्या तत्वप्रणाली वगैरेवर असलेली निष्ठा प्रतिज्ञेच्या स्वरुपात दर्शविण्यासाठी उभे राहतो. तर का नाही आम्ही वचनासाठी उभे राहावे?

***देवाची वाणी ह्या अंतिम दिवसांत*** MAR63-0120M

(The Voice Of God In This Last Days)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी सकाळी, 20 जानेवारी 1963 साली, अपोस्टलिक चर्च, फोनिक्स, लुसीयाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2017 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS
P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A
www.branham.org.